कार्यक्रम बाब क्र. 1

-----------

विषय : महा. पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या 66 व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व मंडळाचे उपाध्यक्ष यांनी मान्य केलेल्या मंडळाच्या दिनांक 27.3.95 (सोमवार) रोजी संपन्न झालेल्या 66 व्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत सोबत मान्यतेसाठी सादर केली आहे.

विषय : दिनांक 27·3·1995 सोमवार रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त·

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाची 66वी सभा सोमवार, दिनांक 27·3·1995 रोजी मा· श्री·बाबासाहेब धाबेकर, राज्यमंत्री, ग्राम विकास व मंडळाचे उपाध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली मंडळाचे मा· अध्यक्ष व मुख्यमंत्री, नगर विकास यांना वेळेअभावी उपस्थित रहाता येत नसल्याने, त्यांचे अनुमतीने मा· मंत्री, ग्राम विकास यांचे दालनात सकाळी 10·30 वाजता घेण्यात आली· सभेस मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते·

1· श्री·बाबासाहेब धाबेकर,
उपाध्यक्ष, म·पा·पु·व ज· मंडळ,
मा· राज्यमंत्री, ग्राम विकास,
मंत्रालय, मुंबई-400 032

2· मा·श्री·अण्णा डांगे,
मंत्री,ग्राम विकास,
मंत्रालय, मुंबई-32
विशेष निमंत्रित

3· श्री·सुरेश कुमार,
सचिव,
ग्राम विकास विभाग,
मंत्रालय,
मुंबई-32

4· श्री·श्री·ब·गांगुर्डे,
उपसचिव, खर्च
वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई-32

5· श्री·जगन्नाथ शिवलींग पाटील,
सदस्य, जिल्हा परिषद,
सोलापूर·

6· श्री· गणेश रॉय,
सदस्य,
अध्यक्ष,चांदूर रेल्वे नगरपरिषद,
जि· अमरावती·

7· श्री·एम·आर·अगरवाल, सदस्य,
ओ-1/5, अगरसेन सोसायटी,
कोरेगांव पार्क, पुणे·

8· श्री·म·के· गोखले, सदस्य,
नृसिंह धाम, विष्णू नगर,
नौपाडा, ठाणे·

··2··

9• श्री•राजेंद्र सगणे, सदस्य सचिव,
म•पा•पु•व ज•मंडळ,
मुंबई-21•

मंडळाच्या सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांच्या रजेस मंजूरी देण्यांत आली•

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाचे खालील अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते•

1• श्री•एस•डी• अरमाळ, मुख्य अभियंता -(प्रकल्प•)
2• श्री•डी•के• भसाळे, मुख्य अभियंता -(नागरी•)
3• श्री•एस•व्ही• शेळवीकर, मुख्य अभियंता -(ग्रामीण•)
4• श्री•एस•के• पाटील, मुख्य अभियंता -(जागतिक बँक•)
5• श्री•ज•बा•आंबेगांवकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी•
6• श्री•एम•आर• कुलकर्णी, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी•

मंडळाचे सदस्य सचिव, श्री•सगणे यांनी प्रथम मंडळाचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष व राज्यमंत्री, ग्राम विकास श्री• बाबासाहेब धाबेकर यांचे मंडळाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन व स्वागत केले व नंतर मंडळाचे उपाध्यक्ष व राज्यमंत्री, ग्राम विकास यांनी उपस्थितांचे स्वागत केले• मंडळाचे सदस्य सचिवांनी मंडळाच्या सदस्यांच्या परिचय करुन दिला व सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास विनंती केली• मंडळाच्या कामकाजास सुरुवात करण्यापूर्वी मा• राज्यमंत्री व मंडळाचे उपाध्यक्ष यांनी सांगतले की शासनाने पिण्याचे पाण्याच्या प्रश्नास प्राधान्य दिले आहे• त्यांनी, पाणी टंचाईच्या काळातील समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाच्या धोरणाची थोडक्यात माहिती देऊन त्यांची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने मंडळातील अधिका-यांनी सातत्याने सतर्क रहावे, योजना बंद पडू देऊ नयेत अशी विनंती केली• यानंतर कामकाजास सुरुवात करण्यांत आली• • मा• मंत्री श्री•अण्णा डांगे, मंत्री ग्राम विकास व विशेष निमंत्रित हे सभा सुरु झाल्यानंतर आले तेंव्हा सदस्य सचिवांनी त्यांचे, मंडळाचे वतीने पुष्पगुच्छ देऊन, हार्दिक अभिनंदन व स्वागत केले•

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या 65 व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे•

मंडळाच्या दिनांक 10•1•95 रोजी झालेल्या 65 व्या सभेचे इतिवृत्त मंडळाचे सभासदांना पत्र क्र•मपापुवजानिमं/1095/सभा 65 / आ-4 दिनांक 2•2•95 द्वारे पाठविण्यांत आले होते त्यास कोणत्याहि सदस्यांनी सूचना अगर दुरुस्ती सुचविली नाही असे मंडळाच्या सदस्य सचिवांनी मा• उपाध्यक्षांच्या नजरेस आणून दिले• सदस्यांनी यावेळीही काही आक्षेप न घेतल्यामुळे प्रसृत इतिवृत्त व 65व्या सभेचे इतिवृत्त म्हणून मंजूर करण्यांत आले•

**कार्यक्रम बाब क्र•2 :**

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या 65 व्या सभेतील बाबींवर करण्यांत आलेली कृती•

मंडळाच्या 64 व्या सभेतील बाबींवर करण्यात आलेली कृती सदस्य सचिवांनी मंडळाच्या निदर्शनास आणली• आस्थापना, इत्यादि व नियंत्रण आकार वाढविणे याबाबत मागील सभेत एक उपसमिती नेमून यासंदर्भात शिफारशी करण्यात याव्यात असे ठरले होते• त्याप्रमाणे मंडळातील अधिकारी व सदस्य यांची एक उपसमिती नेमून त्यांची एक बैठकही झालेली आहे असे सदस्य सचिवांनी सांगतले•

**कार्यक्रम बाब क्र.3 :**

शासनाचे नवीन मंत्रीमंडळ कार्यरत झाल्यानंतर मंडळाची ही पहिलीच बैठक होत असल्याने सदस्य सचिवांनी मंडळासंबंधी माहिती, मंडळाचा विस्तार, मंडळाच्या योजना, यांची माहिती मंत्री महोदय व मंडळाचे उपाध्यक्ष यांना दिली. यावेळी मंडळाला भेडसावणा-या विविध समस्यांबाबतही सदस्य सचिवांनी माहिती दिली. या संदर्भात मा. मंत्री, ग्रा.वि. यांनी सध्याचे विधी मंडळाचे अधिवेशन संपल्यानंतर, एक स्वतंत्र बैठक घेवून मंडळाला भेडसावणा-या समस्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात यावी असे सुचविले.

**कार्यक्रम बाब क्र.4 :**

1994-95 चा सुधारित अंदाजपत्रक

सदस्य सचिव व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी मंडळाच्या 1994-95 चा सुधारीत अंदाजपत्रकाचे विश्लेषण केले व सुधारित अंदाजपत्रक 1994-95 स मंजूरी देण्यात येवून खालील ठराव मंजूर करण्यात आला.

सन 1994-95 च्या सुधारित आय व्ययच्या अंदाजपत्रकात खालील दर्शविल्याप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | अंदाजपत्रक 94-95 | सुधारित अंदाजपत्रक 94-95 |
|---|---|---|---|
| 1. | महसूली उत्पन्न. | 16160.00 | 15848.00 |
| 2. | महसूली खर्च | 16667.80 | 16548.15 |
| 3. | भांडवली मिळकत. | 26281.28 | 24727.58 |
| 4. | भांडवली खर्च. | 26280.00 | 24727.58 |

**कार्यक्रम बाब क्र.5 : सन 1995-96 चे अर्थसंकल्प.**

सदस्य सचिव व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी मंडळाचा 1995-96 चा अर्थसंकल्प मंडळापुढे सादर केला व त्याचे सविस्तर विश्लेषण केले. यावर मंडळाचे सदस्य श्री. गोखले यांनी असा प्रश्न केली की, 94-95 च्या सुधारित अंदाजपत्रकातील तरतूदीच्या मानाने 1995-96 अर्थसंकल्पातील भांडवली खर्चाची तरतूद तिप्पट वाढल्याने दिसून येते. याची कारणे काय ? यावर वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी खुलासा केला की, भांडवली मिळकत व खर्चाचे आकडे हे शासनाला कळविलेल्या माहितीवर आधारित असतात आणि शासनाचा अर्थसंकल्पात काही बदल झाल्यास त्याप्रमाणे सुधारीत अंदाजपत्रक तयार केले जातात. यावर अर्थसंकल्पावर चर्चा होऊन सन 1995-96 च्या अर्थसंकल्पास मान्यता देण्यात आली व खालील ठराव मान्य करण्यांत आला.

ठराव :

सन 1995-96 च्या अर्थसंकल्पास खालील दर्शविल्याप्रमाणे मंजूरी देण्यांत येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रकात 94-95 | अंदाजपत्रक. 95-96 |
|---|---|---|---|
| 1. | भांडवली मिळकत | 24727.58 | 45882.00 |
| 2. | भांडवली खर्च | 24727.58 | 45882.00 |
| 3. | महसूल उत्पन्न | 15848.00 | 17480.00 |
| 4. | महसूल खर्च | 16548.15 | 17097.80 |

मंडळ असे आदेश देत आहे की, सन 1995-96 त खर्च करतांना मंडळ अधिनियमातील कलम 34 -(1) मधील तरतूदीचे अनुपालन करावे.

कार्यक्रम बाब क्र.6 :

प्रकल्पाबाहेरील पाणीपट्टीचे दर त्वरीत वाढविण्याची आवश्यकता असल्याचे मंडळाचे सदस्य सचिव यांनी विषद करुन सांगितले यावर मा. अध्यक्षांनी असा उल्लेख केला की, पाणीपट्टीचे दर वाढवले म्हणजे मंडळाची जबाबदारी वाढविणे असे होईल कारण नगरपालिका पैसे भरत नाही. यावर सदस्य सचिवांनी खुलासा केला की, दर वाढवले नाही तर मंडळाला तोटा येईल व अधिनियमातील तरतूदीनुसार लेखापरिक्षणाकडून तोटयाबद्दल आक्षेप घेतला जाईल म्हणून दर वाढविणे आवश्यक राहील. पाणी पुरवठा केंद्र चालविण्यासाठी लागणा-या बाबीवरील भाववाढ लक्षात घेता प्रत्येक वर्षी 15 ते 20 टक्के दरवाढ केली जाते. या वर्षापासून कर्ज परतफेडीची जबाबदारी जास्त येणार असल्याने, सध्याच्या दरात 20 टक्के नी वाढ सुचविली आहे. यावर चर्चा होऊन प्रस्ताव मंजूर करण्यात आला व खालील प्रमाणे ठराव संमत झाला.

ठराव :

मंडळ असा ठराव करीत आहे की, मंडळाच्या ग्राहकांसाठी करावयाच्या पाणी पुरवठयाचा दर दिनांक 1-5-1995 किंवा सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून खालील प्रमाणे असतील.

| अ.क्र. | ग्राहकाचा तपशील | दर पैशात प्रति 1000 लि. |
|---|---|---|
| 1. | 2. | 3. |
| 1. | घाऊक घरगुती पाणी पुरवठा. | |
| अ. | घरगुती. | |
| | 1. महाराष्ट्र विद्युत मंडळाची देयके परस्पर भरणा-या नगरपालिकांना केलेला घाऊक पाणी पुरवठा. | 120 |
| | 2. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे विद्युत देयके न भरणा-या इतर नगरपरिषदांना केलेला पाणी पुरवठा. | 350 |
| | 3. मंडळाच्या मुख्य वितरणातून प्रतिमहा 2 द.ल.लि. पेक्षा जास्त पाणी घेणारे घरगुती ग्राहक. | 350 |
| ब. | बिगर घरगुती पाणी पुरवठा | 1730 |

2. किरकोळ पाणी पुरवठा

| | | |
|---|---|---|
| अ. | घरगुती | 360 |
| ब. | बिगर घरगुती. | |
| | 1. "क" वर्ग नगरपालिकाखेरीज होणारा पाणी पुरवठा. | 1730 |
| | 2. "क" वर्ग नगरपालिकेतील प्रतिमहा 2 द.ल.लि. पर्यंत पाणी घेणा-या ग्राहकांसाठी केलेला पाणी पुरवठा ( "क" वर्ग नगरपालिकेतील प्रतिमहा 2 द.ल.लि.पेक्षा जास्त पाणी घेणा-या ग्राहकांना वरिल 1-ब प्रमाणे दर आकारण्यांत येईल.) | 865 |
| 3. | शाळा, महाविद्यालये, शासकीय-निमशासकीय कार्यालये, धर्मादाय संस्था, सरकारी रुग्णालये आणि ना नफा तत्वावर चालणा-या संस्था. | 720 |
| 4. | विशेष ग्राहक. | |
| | 1. औरंगाबाद पेपर मिल्स्, पैठण | 560 |
| | 2. लष्करी कारखान्याना करावयाचा शुध्द पाणी पुरवठा | |
| | अ. अंबाझरी | 720 |
| | ब. ओझर | 720 |
| | क. अणुशक्ती केंद्र, तारापूर. | 720 |
| 5. | गिरीस्थाने | |
| | 1. घरगुती. | 380 |
| | 2. बिगर घरगुती. | 2160 |

6. मापन यंत्र असलेल्या नळ जोडासाठी किमान आकार.

एखाद्या महिन्यात पाण्याचा वापर विहित किमान प्रमाणापेक्षा कमी असेल तर खालील प्रमाणे किमान दर आकारला जाईल.

दर रुपयात

| नळ जोडाचा आकार | थेट घरगुती वापरासाठी दर प्रती नळ जोडास प्रतिमास. | ना नफा तत्वावर चालवणा-या संस्था ज्या वरील ठरावातील अ.क्र. 3 मध्ये दर्शीवल्या आहेत. त्या संस्थांना प्रती नळास प्रतिमास. | बिगर घरगुती वापरासाठी दर प्रत नळ जोडास प्रतिमास. |
|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. |
| 15 मि.मि. | 35 | 73 | 173 |
| 20 मि.मि. | 70 | 146 | 346 |
| 25 मि.मि. | 138 | 293 | 691 |
| 32 मि.मि. | 208 | 438 | 1037 |
| 40 मि.मि. | 282 | 583 | 1383 |
| 50 मि.मि. | 346 | 728 | 1728 |
| 60 मि.मि. | 449 | 949 | 2248 |

7. मापनयंत्र नसलेल्या नळ जोडसाठी किमान आकार.

अ. ज्या नळ जोडास मापन यंत्र बसविले नसेल अशा ठिकाणी नळ जोडाच्या आकारावरुन खालील प्रमाणे किमान आकार आकारला जाईल.

दर रुपयात

| नळ जोडा आकार | घरगुती वापरासाठी सरसकट सरसकट दर प्रती नळ जोडास प्रतिमास. | ना नफा तत्वावर चालणा-या संस्था ज्यावरील ठरावातील अ.क्र.3 मध्ये दर्शीवल्या आहेत अशा संस्थासाठी प्रति नळ जोडास प्रतिमास. | बिगर घरगुती वापरासाठी सरसकट दर प्रति नळ जोडास प्रतिमास. |
|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. |
| 15 मि.मि. | 80 | 161 | 410 |
| 20 मि.मि. | 161 | 323 | 906 |
| 25 मि.मि. | 323 | 646 | 1640 |

ब. बसविलेले मापनयंत्र 3 महिन्यापेक्षा अधिक काळापासून चालू नसेल अशा नळ जोडांना त्यांनी 3 महिन्यात वापरलेल्या पाण्याची सरासरी किंवा मापनयंत्र नसलेल्या नळ जोडासाठी असलेले वरील किमान दर यातील जी जास्त रक्कम असेल ती रक्कम आकारण्यात येईल.

25 मि.मि. पेक्षा जास्त आकाराचे नळ जोड फक्त मापनयंत्र असलेल्या नळ जोडासाठी देण्यात येतील. विभागीय अधिका-यांनी 25 मि. मि. पेक्षा जास्त आकाराच्या नळ जोडसाठी मापनयंत्र बसविल्याशिवाय पाणी पुरवठा करु नये.

8. **ठोक पाणी पुरवठयासाठी किमान आकार.**

ठोक पाणी पुरवठयासाठी किमान आकार करार पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे रहातील. तसेच हा किमान दर 2 द.ल.लि. पाणी पुरवठयाच्या आकारापेक्षा कमी असणार नाही.

9. **मापनयंत्र नसलेल्या सार्वजनिक नळ जोडासाठी आकार.**

अ. मापन यंत्र नसलेल्या प्रत्येक सार्वजनिक नळ जोडास प्रतिमास रु. 418/-.

ब. सार्वजनिक नळ जोडास मापन यंत्र बसवावयाचे असेल तर ते बसवावे परंतू त्याची देखभाल करणे ही ग्राहकांची जबाबदारी राहील. जर अशी मानयंत्रे तीन महिन्यापेक्षा जास्त काळ चालू नसतील तर तीन महिन्यात वापरलेल्या पाण्याची सरासरी किंवा मापनयंत्र नसलेल्या सार्वजनिक नळ जोडासाठी असलेला दर यातील जी रक्कम आकारण्यात येईल.

10. **विलंबित प्रदान विषयक आकार.**

असेही नमूद करण्यांत येत आहे की, प्रत्येक ग्राहकास देयकाच्या दिनांकापासून 30 दिवसाच्या आत देयकाचा मागील थकबाकीसह भरणा न केल्यास दरमहा 1.5 टक्के दराने विलंब प्रदान आकार, देयक मिळालेल्या तारखेपासून 30 दिवसानंतरच्या कालावधीसाठी द्यावा लागेल. जे ग्राहक सलग सहा महिन्याच्या देयकाचा भरणा करणार नाहीत त्याचा पाणी पुरवठा बंद करण्यांत येईल.

**कार्यक्रम बाब क्र•7 :**

या कार्यक्रम बाबीबद्दल सदस्य सचिवांनी पार्श्वभूमी विषद करुन सांगतली व मंडळ सदस्यांनी बहुमतांनी मंजूर केलेल्या खालील कार्यक्रम बाबीचे अनुसमर्थन करुन खालिल प्रमाणे ठराव संमत झाला•

**ठराव :**

"असा ठराव करण्यात येतो की, आयुर्विमा महामंडळाचे पत्र क्र•आयएनव्हीपीएसडी, दिनांक 9•2•1995 (परिशिष्ट "अ") अन्वये यवतमाळ वाढीव पाणी पुरवठा योजना (चापडोह धरण स्त्रोत) अंदाजित खर्च रु• 2720•00 लाख या योजनेस मंजुर केलेले रु• 896•67 लाख कर्ज, योजनेच्या प्रगतीनुसार टप्प्या टप्प्याने उभारणीसाठी, या पत्रातील अटी व शर्ती मान्य करुन मंडळाची सामान्य मुद्रा (कॉमन सील) उठवून करारनामा सादर करण्यासंबंधांत मंडळाचे सदस्य सचिव व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना अधिकृत अधिकारी म्हणून मान्यता देण्यात येत आहे•

**कार्यक्रम बाब क्र•8 :**

**दिनांक 1•4•95 पासून ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषद हस्तांतर करुन घेणार नाहीत त्यांचा पाणी पुरवठा बंद करणेबाबतचे आदेशास दिलेली स्थगिती•**

दिनांक 20•10•94 रोजी झालेल्या मंडळाच्या 64 व्या सभेत, जिल्हा परिषदेने वा ग्रामपंचायतीनी ताब्यात न घेतलेल्या योजना मंडळाने चालवू नयेत असा सर्व सदस्यांनी आग्रह धरला असल्याने त्या सभेमध्ये अशा योजना 31•3•95 पर्यंत जिल्हा परिषद / ग्राम पंचायत यांनी ताब्यात घेतल्या नाहीत तर 1•4•1995 पासून मंडळाने चालविण्याचे बंद करावे असे सुचविले होते व त्यावर मंडळाने तसे आदेशही दिले होते•

तथापि सध्याची पाण्याची तीव्र टंचाई लक्षात घेता व नवीन शासन आल्याने या निर्णयास शासनाची पूर्ण संमती आवश्यक असल्याने, दिनांक 1•4•95 पासून योजना राबविणे बंद करावयाच्या आदेशास पुढील निर्णय होईतो स्थगिती देण्यांत आल्याचे सदस्य सचिवांनी मंडळाचे निदर्शनास आणून दिले•

या संदर्भात मा• उपाध्यक्षांनी, जिल्हा परिषदा / ग्राम पंचायती यांचे उत्पन्न अतीशय कमी असल्यामूळे व या योजना त्या संस्था चालवूनच शकणार नाहीत व त्याचा उपाय पाणी पुरवठा बंद करणे हा नसून त्या योजना कशा प्रकारे राबवता / चालवता येतील याचा विचार योजना तयार करतानाच करणे आवश्यक आहे असे मार्गदर्शन केले•

सुधारित अंदाजपत्रक व अर्थसंकल्प या कार्यक्रम बाबी इंग्लीश मध्ये असल्याने यापुढील मंडळाच्या कार्यक्रम बाबी मराठीतूनच असाव्यात असेहि सुचविण्यांत आले•

मंडळातील योजना, मंडळास भेडसावत असणा-या समस्या याबाबत सविस्तर चर्चेसाठी अधिवेशनानंतर बैठक बोलावण्यात येईल व मंडळापुढे असलेल्या समस्या दूर करण्याचे दृष्टिने प्रयत्न करता येतील असे मा• मंत्री, ग्राम विकास व मा• राज्यमंत्री व मंडळाचे उपाध्यक्ष यांनी सांगतले•

शेवटी श्री• राजेंद्र सगणे, सदस्य सचिव यांनी सर्वांचे आभार मानले व मंडळाची सभा साधारणपणे दर दोन महिन्यांनी घेण्याचे ठरले आहे त्याप्रमाणे पुढील सभेची तारीख ठरवून नंतर कळविण्यांत येईल असे सांगून सभा समाप्त झाल्याचे सांगतले•

-x-x-x-x-

एनएनजी••